# विपश्यना

साधक (मराठी)

साधकांचे मासिक प्रेरणा पत्र

वार्षिक शुल्क रु. ३०/-
आजीवन शुल्क रु. ५००/-

बुद्धवर्ष २५६१, कार्तिक पौर्णिमा, ४ नोव्हेंबर, २०१७, वर्ष १ अंक ८

वेगवेगळ्या भाषेतील पत्रिकांसाठी पाहाः http://www.vridhamma.org/Newsletter_Home.aspx


**धम्मवाणी**

**असद्धो अकतञ्ञू च, सन्धिच्छेदो च यो नरो।**
**हतावकासो वन्तासो, स वे उत्तमपोरिसो॥**

*धम्मपदपाळि - ९७, अरहन्तवग्गो*

सत्पुरुष सर्वत्र (पाच स्कंधात) आसक्ती सोडतात. संत जन कामभोगासाठी एखादी गोष्ट करीत नाहीत. सुख मिळो अथवा दुःख पंडित (जन) (आपल्या मनाचे) चढ-उतार प्रदर्शित करत नाहीत.

## प्रथम गृहस्थ विपश्यनाचार्य सया तैजी

**(सन १८७३ ते १९४५)**

*(खालील वृत्तांत आंशिक रुपाने म्यंमाचे एक धर्माचार्य ऊ ठे लाईं द्वारे लिखित 'सया तैजी' नावाच्या पुस्तकातून घेतला आहे.)*

क्रमशः... (भाग २)

लैडी सयाडोंचा आशीर्वाद घेऊन सया तैजी आपल्या संबंधितांसह दक्षिण ब्रह्मदेशात स्थित आपल्या गावी डल्ला (प्याब्वेजी) येथे परत आले. लैडी सयाडोंच्या ह्या आदेशाच्या पालनाबाबत परिवाराच्या अन्य सदस्यांशी चर्चा केली. सया तैजींच्या मनात पूर्ण ब्रह्मदेशात फिरून शिबिर लावण्याचा विचार आला. त्यांना वाटले की यामुळे ते जास्त लोकांच्या संपर्कात येतील. परंतु त्यांच्या सालीने सुचवले–"येथे आपणाजवळ धम्मकेंद्र आहे व साधकांच्या भोजनाची व्यवस्था करून आम्ही सर्व आपली मदत करू शकतो. आपण इथेच राहून शिबिर का घेत नाही? अनेक लोक आहेत जे विपश्यना शिकण्यास येथे येतील." त्यांनी हे मान्य केले व प्याब्वेजी (डल्ला) येथेच राहून आपल्या केंद्रात नियमित शिबिर लावू लागले.

त्यांच्या सालीच्या म्हणण्यानुसार अनेक लोक येऊ लागले व ध्यानाचार्याच्या रुपाने सया तैजी विख्यात झाले. ते सामान्य शेतकरी, मजूरांपासून ते पाली ग्रंथांच्या विद्वानांपर्यंत सर्वांनाच विपश्यना शिकवीत असत. हे गाव इंग्रजांची राजधानी रंगूनपासून दूर नव्हते, त्यामुळे ऊ बा खिन सारखे सरकारी कर्मचारी, अधिकारी व शहरी लोकही येऊ लागले.

जसे-जसे अधिक साधक येऊ लागले, त्यांनी उ न्यो, ऊ बा सो व ऊ न्यूं सारख्या जुन्या अनुभवी साधकांना सहायक आचार्य बनवले.

प्रतिवर्षी केंद्राचा विस्तार होत गेला आणि शिबिरात भिक्षू, भिक्षुणी तसेच साधकांची संख्या २०० पर्यंत होऊ लागली. केंद्रात पुरेशी जागा नसल्यामुळे अधिक अनुभवी जुने साधक आपल्या घरीच ध्यान करायचे व केवळ प्रवचनांसाठी केंद्रात यायचे.

लैडी सयाडोंच्या केंद्रातून परत आल्यावर सया तैजी एकांत व मौनात एकटे राहू लागले व दिवसातून एकदाच जेवू लागले. भिक्षूप्रमाणे ते ही आपल्या आध्यात्मिक उपलब्धींची चर्चा कोणाशीही करत नसत. पूर्ण ब्रह्मदेशात त्यांना अनागामी मानले जात होते, म्हणजे, ज्याने अरहंतापूर्वीची अवस्था प्राप्त केली आहे. परंतु त्यांनी कधीही सांगितले नाही की ते स्वतः वा त्यांचे शिष्य कोणत्या स्तरावर आहेत. ब्रह्मदेशात ते "अनागामी सया तैजी" च्या नावाने ओळखले जात असत.

त्या दिवसात कदाचित अन्य कोणी गृहस्थ विपश्यना आचार्य नव्हते. त्यामुळे सया तैजींना काही अडचणींचाही सामना करावा लागला, ज्यांचा सामना भिक्षूंना करावा लागला नसता. जसे, काही लोक त्यांचा विरोध यासाठी करीत असत की ते शास्त्रात तेवढे विद्वान नव्हते. सया तैजींनी या निंदेची पर्वा केली नाही. त्यांनी साधनेद्वारे साधकांना मिळणाऱ्या परिणामांनाच बोलू दिले.

एकदा त्यांच्या शेतात काम करणाऱ्या मजुरांनी त्यांच्या सज्जनतेचा गैरफायदा घेऊन पिकात त्यांना हिस्सा दिला नाही. जरी शेतीच्या देखदेखी पासून त्यांनी विरक्ती घेतली होती, तरीही ते आपल्या मार्गापासून दूर जाऊन भांडणाला सोडवण्यासाठी गेले. ज्यामुळे त्यांचे विरोधी क्रोध व हिंसेच्या वशीभूत होऊन आपल्या अकुशल प्रवृत्तीला अजून वाढवू नयेत.

आपल्या स्वतःच्या अनुभवाने व लैडी सयोडोंच्या दीपनींवर निर्भर होऊन त्यांनी तीस वर्षांपर्यंत सर्व येणाऱ्यांना ध्यान शिकविले. त्यांनी हजारों लोकांना विपश्यना शिकवण्याचे आपले लक्ष ७२ वर्षाच्या वयात सन १९४५ मध्ये पूर्ण केले. त्यांच्या पत्नीचा मृत्यू झाला होता व त्यांची सालीही लकवाग्रस्त झाली होती. तसेच त्यांचे स्वतःचे स्वास्थ्यही क्षीण होत होते. त्यामुळे त्यांनी पन्नास एकर जमीन धम्मकक्षाच्या निर्वाहासाठी वेगळी ठेऊन आपली इतर सर्व संपत्ती भाचे, पुतणे व भाची, पुतणी यांना वाटून टाकली.

त्यांच्याजवळ वीस म्हशी होत्या, ज्यांनी अनेक वर्षांपर्यंत त्यांच्या शेतात नांगरटीचे काम केले होते. त्यांना त्या लोकांना दिले ज्यांच्यावर त्यांना विश्वास होता की ते त्यांच्यासोबत दयेने व्यवहार करतील. त्या म्हशींना या शुभेच्छासह पाठवले– "तुम्ही मला भरपूर लाभ दिला आहे, तुमच्यामुळे तांदुळ उत्पन्न झाले, धान्य उत्पन्न झाले. आता तुम्ही आपल्या कामातून मुक्त आहात. तुम्हाला या प्रकारच्या जीवनातून मुक्ती मिळावी व पुढील भव चांगला मिळावा."

सया तैजी आपला इलाज करण्यासाठी व रंगून येथे राहाणाऱ्या आपल्या शिष्यांना भेटण्यासाठी गेले. त्यांनी आपल्या काही शिष्यांना सांगितले की ते रंगून येथेच देहत्याग करतील. त्यांचा दहन संस्कार त्या जागी व्हावा ज्या जागी या पूर्वी कोणाचाही झाला नसेल. त्यांनी हेही म्हटले की त्यांच्या अस्थींना एखाद्या पवित्र स्थानी ठेऊ नये, कारण ते अजून सर्व प्रकारच्या संयोजनां (जन्म देणाऱ्या बंधनां) पासून मुक्त झाले नाहीत, म्हणजे, ते अरहंत झालेले नाहीत.

त्यांच्या शिष्यांपैकी एकाने श्वेडेगॉन पॅगोड्याच्या उत्तर उतारावर 'आजनिगॉन' वर एका ध्यान केंद्राची स्थापना केली होती. त्याच्या जवळच एक तळघर होते ज्याला दुसऱ्या विश्वयुद्धाच्या काळात बॉम्ब वर्षावापासून वाचण्यासाठी बनवण्यात आले होते. सया तैजी याचा उपयोग ध्यानासाठी शून्यागाराच्या रुपाने करायचे. रात्री ते एखाद्या सहायक आचार्याला सोबत ठेवत असत. रंगूनमधून त्यांचे अनेक शिष्य जसे महालेखाकार ऊ बा खिन व आयकर आयुक्त ऊ सां थैं त्यामध्ये सामील होते. जेव्हा वेळ मिळेल तेव्हा त्यांना भेटायला येत असत.

जो कोणी त्यांना भेटायला आला, त्याला ते मनपूर्वक साधना करण्याबाबत, ध्यान शिकण्यासाठी येणाऱ्या भिक्षू, भिक्षुणींचा आदर

करण्याबाबत, काया, वाणी व चित्तावर संयम ठेवण्याबाबत तसेच प्रत्येक कर्माने भगवान बुद्धांचा सन्मान करण्याबाबत उपदेश देत असत.

त्यांना रोज संध्याकाळी श्वेडगॉन पॅगोड्यात जाण्याची सवय होती, परंतु जमिनीखाली बनलेल्या तळघरात बसण्यामुळे एका आठवड्यानंतर त्यांना सर्दी व ताप आला. डॉक्टरांच्या इलाजानंतरही त्यांची स्थिती बिघडत गेली. स्थिती नाजुक झाल्यानंतर त्यांचे सर्व भाचे व पुतणे प्याब्वेजीतून रंगूनला पोहोचले. प्रत्येक रात्री जवळपास पन्नास शिष्य एकत्र बसून ध्यान करीत असत. या सामूहिक साधनेत सया तैजी काही बोलत नसत, पण मौन राहून ध्यान करत असत.

एका रात्री जवळपास दहा वाजता त्यांच्याजवळ अनेक शिष्य होते (ऊ बा खिन त्या वेळी तिथे पोहचले नव्हते.), ते सरळ झोपले होते, त्यांचा श्वास मोठा व दीर्घ झाला होता. दोन शिष्य काळजीपूर्वक लक्ष ठेऊन होते व बाकी साधनेत मग्न होते. ठीक अकरा वाजता श्वास अजून सखोल झाला. प्रत्येक श्वास घ्यायला व सोडायला पाच मिनिट लागू लागली. या प्रकारे तीन दीर्घ श्वासांनंतर श्वास पूर्णपणे थांबला व सया तैजींचा देहांत झाला.

त्यांच्या शरीराचा दाहसंस्कार श्वेडेगॉन पॅगोड्याच्या उत्तर उतारावर केला गेला. नंतर सयाजी ऊ बा खिन व त्यांच्या शिष्यांनी तिथे एका छोट्या पगोड्याचे निर्माण केले. परंतु या अनुपम आचार्यांचे खरे स्मारक हे सत्य आहे की लैडी सयाडोंपासून त्यांना मिळालेल्या धम्माला समाजाच्या प्रत्येक वर्गात पसरवण्याचे महान कार्य आजही निर्विघ्न रुपाने सुरू आहे. सर्वांचे मंगल होवो!

## सया तैजीबाबत संस्मरणः

सत्यनारायण गोयन्का

## कृषक आचार्य

रंगूनच्या पलीकडे, एका गावात ऊ तै (श्री तै) नावाचे एक शेतकरी राहात होते. पिक कापणी झाल्यावर, प्रत्येक वर्षी ब्रह्मदेशात जागोजागी या शोधात जात असत की कुठे कोणी ध्यानाचे आचार्य भेटावेत. शेवटी त्यांना एक आचार्य मिळाले ज्यांनी त्यांना आनापानाद्वारे मनाला एकत्र करणे शिकवले. सात वर्षांपर्यंत ते याच आचार्यांजवळ सतत जात राहिले आणि समाधीत कुशल झाले. त्यानंतर ते विपश्यना शिकण्यासाठी एखाद्या आचार्यांच्या शोधात निघाले व सौभाग्याने लैडी सयाडो यांना भेटले. या सन्माननीय भिक्षूंनी या शिष्याची पात्रता जाणली व विधी शिकवला, पुढील सात वर्षांपर्यंत त्यांनी लैडी सयोडोंसोबत ध्यान करून प्रज्ञेतही प्रवीणता प्राप्त केली. आता ते या शिकलेल्या विद्येला दुसऱ्यांना शिकवण्यापासून स्वतःला अडवू शकले नाहीत. लैडी सयाडोंची परवानगी मिळवून ते आपल्या गावी परतले व दुसऱ्यांना शिकवणे सुरु केले.

सुरवातीला त्यांच्याजवळ कोणी येतच नव्हते. 'हा काय जाणेल धम्माला', लोकांनी चेष्टा केली. "हासुद्धा आमच्यासारखाच गृहस्थ आहे. याने ना तर मुंडण केले आहे व ना तर भिक्षूचे पीतवस्त्र धारण केले आहे. हा काय जाणेल विपश्यना?"

सया तैजी (आचार्य तै जी) निराश झाले नाहीत. त्यांच्या शेतात काही मजूर होते, त्यांनी त्यांना बोलावून म्हटले, "आपण नेहमी शेतात काम करता, परंतु आपली इच्छा असेल तर मी माझ्या घरी काम करण्यासाठी तुम्हाला वेतन देईन."

"जशी आपली इच्छा असेल साहेब, आम्हाला तर पैश्याशी मतलब आहे." सया तैजी त्यांना एक पडदा टाकलेल्या खोलीत घेऊन गेले. ते म्हणाले,"ठीक आहे, बसा, डोळे बंद करा व आपले सारे लक्ष श्वासावर ठेवा."

ते लोक चकित झाले. "आम्हाला हेच काम करायचे आहे काय?" ते विचार करू लागले. "कदाचित आमचे मालक वेडे झाले असावेत! हे म्हणतात, फक्त श्वास पाहाण्यासाठी आम्हाला खाऊ घालतील व पैसे ही देतील! जर ते हेच काम करवू इच्छित असतील तर आम्ही हेच करू." या प्रकारे ते लोक सया तैजींच्या म्हणण्यानुसार काम करू लागले. कोणी मजूर अशिक्षित असेल अथवा एखादा शिकलेला प्रोफेसर ही विद्या सर्वांनाच एकसारखा परिणाम देते.

शिबिर पूर्ण झाल्यावर मजूर इतरांना सांगू लागले, "आमचे मालक एक अशी अद्भुत ध्यानविद्या शिकवितात, जी मनात खरी शांती आणते," परंतु लोकांनी त्यावर विश्वास केला नाही. लोकांनी विचार केला की त्यांनी मजुरांना पैसे यासाठी दिले असतील की ते लोकांना त्यांच्याकडे आकर्षित करण्यासाठी त्यांचे गुणगान करतील.

परंतु काही महिन्यांनंतर पूर्ण गावातील लोकात चर्चेचा विषय झाला की ऊ तै च्या मजुरात खूप मोठे परिवर्तन झाले आहे. त्यापैकी अनेक पूर्वी कर्कश आवाजात ओरडत, गुंडाप्रमाणे वागत, नेहमी नशा करून भाडण करत असत, पण आता ते विनम्र व शांत झाले आहेत. त्यामुळे गाववाल्यांनी उत्सुकतेमुळे त्यांना विचारले "तुमच्या मालकाने तुम्हाला काय शिकवले?" मजुरांनी आपल्या क्षमतेनुसार सांगितले. त्यामुळे गावातले लोक प्रभावित झाले. ते म्हणू लागले "हेच तर बुद्ध शास्त्र सांगते. कदाचित ते निश्चित काही जाणत असतील. त्यांच्याजवळ जाऊन पाहावे की ते काय शिकवतात?"

कोणत्याही निमित्ताने लोक शिबिरात आले तरी, जर ते योग्य प्रकारे साधना करतील तर त्यांना चांगले परिणाम अवश्य मिळतील. या प्रकारे सया तैजींच्या नावाचा प्रसार होऊ लागला व ते लैडी सयाडोंचे सर्वश्रेष्ठ शिष्य बनले.

## अग्नीशी खेळ

सया तैजींजवळ ध्यान शिकण्यासाठी एक बुद्धानुयायी विद्वान आला. दुर्भाग्याने तो विपश्यनेचा स्वतः अनुभव करण्यापेक्षा तिचा सिद्धांत जाणण्यात जास्त उत्सुक होता. तरीही त्याने सफलतापूर्वक शिबिर पूर्ण केले व आपल्या उपलब्धीमुळे आनंदी होऊन निघून गेला.

काही महिन्यांनंतर तो सज्जन सया तैजींना भेटण्यासाठी परत आला. त्याने एका पुस्तकांच्या काही प्रती सोबत आणल्या होत्या. तो म्हणाला "श्रीमान, ध्यान कसे करायचे याबाबत मी एक पुस्तक लिहिले आहे व आपणाला गुरु मानून ते आपल्याला समर्पित केले आहे."

"तुम्ही एवढ्याच प्रती मला समर्पित केल्या आहेत काय?" सया तैजींनी विचारले.

"नाही, श्रीमान, सर्व समर्पित आहेत."

"ठीक आहे, तुम्ही आपल्या पुस्तकांच्या सर्व प्रती समर्पित करू इच्छिता तर सर्वांना इथे आणा." तो विद्वान खूप प्रसन्न झाला, कदाचित त्याला वाटले असेल की त्याला आशीर्वाद देण्यासाठी ते काही कर्मकांड करतील. काही दिवसानंतर तो गाडीभर पुस्तकांसह परत आला.

"तुमच्या पुस्तकांच्या ह्या सर्व प्रती आहेत काय?" सया तैजींनी विचारले.

"होय" त्या सज्जनाने मोठ्या गर्वाने उत्तर दिले.

"ठीक आहे", त्यांना खाली जमिनीवर ठेवा." त्यांच्या सांगण्यानुसार त्या सज्जनने चांगल्याप्रकारे खाली जमिनीवर त्यांचा ढीग लावला.

"आता स्वयंपाक घरातून रॉकेल व आगपेटी आणा." सया तैजी म्हणाले.

"श्रीमान, रॉकेल व आगपेटी?" तो सज्जन आश्चर्यात पडला, एखाद्या कर्मकांडात याचे काय काम?

"होय, रॉकेल व आगपेटी." पुन्हा एकदा त्या सज्जनाने, अनिच्छेनेच ऐकल्यानुसार केले. जेव्हा तो रॉकेल व आगपेटी घेऊन परत आला तेव्हा सया तैजी म्हणाले, "आता पुस्तकांवर रॉकेल टाकून आग लावा."

आता मात्र तो विद्वान स्वतःला थांबवू शकला नाही. "श्रीमान, आपण माझी गंमत करत आहात. मी हे लिहिण्यासाठी अनेक महिने श्रम केले आहेत."

सया तैजी म्हणाले "चांगले झाले असते, जर तुम्ही तो वेळ ध्यान

करण्यात लावला असता व त्याचा सदुपयोग केला असता, जर तुम्ही ध्यानाचा सखोल अभ्यास करणार नाही तर इतरांना त्याबाबत कसे समजवाल? तुम्हाला योग्य प्रकारे समजले आहे तरीही तुम्ही इतरांकडून कशी अपेक्षा करता की ते पुस्तक वाचून ध्यान शिकतील? ज्या प्रकारे मुले अग्नीशी खेळून स्वतःला जाळून घेतात, तसेच ते स्वतःला जाळतील. चांगले आहे, त्यापेक्षा पुस्तकांनाच जाळा,"

*(सयाजी ऊ बा खिन जर्नलमधून साभार)*

## विश्व विपश्यना पॅगोडा परिसरात धर्मयात्रेचा इतिहास सांगणारे 'संग्रहालय'

आम्ही खूप भाग्यशाली आहोत की पूज्य गुरुजी श्री सत्यनारायण गोयन्कांपासून आम्हाला परिशुद्ध धर्म प्राप्त झाला.

सयाजी ऊ बा खिनांची आज्ञा शिरोधार्य मानून सन १९६९ मध्ये भारतात येऊन त्यांनी एक अद्वितीय व्यक्तित्वाचा परिचय देत अनेक स्तरांवर धर्माचा विस्तार केला. शिविर संचालनासोबतच सहायक आचार्यांची व ट्रस्टिंची नियुक्ती केली, विपश्यना केंद्रांची स्थापना केली, शिबिर संचालनासाठी रेकॉर्डिंग केली, नियमावली बनवली, भविष्यासाठी दिशानिर्देश दिले व बुद्धवाणीला शताब्दींपर्यंत जीवंत ठेवण्यासाठी 'विपश्यना विशोधन विन्यास'ची स्थापना करुन पाली त्रिपिटक व अन्य पुस्तकांचे प्रकाशन, प्रसारण करवले. 'बुद्धवाणी' आज विश्वाच्या चौदा लिपीत इंटरनेटवर सहज उपलब्ध आहे. त्यांनी लिहिलेले अनेक लेख, प्रवचन इत्यादींचे प्रकाशन होत आहे.

तसेच मुंबईत बहुउद्देशीय 'विश्व विपश्यना पगोडा'चे निर्माण करवले, जिथे बुद्धांच्या पवित्र धातू ठेवलेल्या आहेत, ज्यांची ऊर्जा साधकांना अपूर्व शक्ती प्रदान करते. पगोड्याच्या आत एक विशाल ध्यानकक्ष आहे. हा पगोडा जणू धर्माची मशाल घेऊन मूर्तरूपाने उभा आहे. येणाऱ्या काळात **'एहि-पस्सिको'** चे आवाहन करीत न जाणे किती लोकांना मार्गदर्शन करत राहील. येथे दर्शकांसाठी प्रदर्शन व धर्मश्रवण कक्षही आहे.

श्री गोयन्काजींची कल्पना होती की धर्माच्या द्वितीय शासना (पुनरुत्थान काळा) त असे संग्रहालय (Museum) व संरक्षणालय केंद्र (Digital Archives Centre) बनावे, जे येणाऱ्या पिढ्यांना हे सांगतील की द्वितीय बुद्ध शासनाचे पुनरुत्थान कसे झाले. तसेच कसे हे प्रारंभी थेंबरूपी होते, जे नंतर समुद्ररूपी झाले. यांना पाहून पर्यटक बुद्धांच्या महान उपदेशांशी परिचित होतील, आनापान व विपश्यनेबावत जाणू शकतील व त्यांच्यात धर्मसंवेग जागेल.

याच उद्देशाच्या पूर्तीसाठी विश्व विपश्यना पॅगोड्याच्या विश्वस्तांनी निर्णय केला की आपणा सर्वांतर्फे प्राप्त सामग्रींचे एक विशाल संग्रहालय (Museum) बनवावे व एक **आंकिक संरक्षणालय केंद्र** (Digital Archives Centre) ही, जे विपश्यनेसंबंधी सर्व प्रकारच्या उपलब्ध सामग्रींना पिढींपर्यंत सुरक्षित ठेवेल.

संग्रहालयात विस्तृत विवरणांसह गुरुजींच्या श्रद्धा व प्रेरणेचे स्रोत असलेले गुरुदेव सयाजी ऊ बा खिन, त्यांचे गुरु सया तैजी व त्यांचे गुरु भदंत लैडी सयोडोंबाबतही प्राप्त माहितीच्या आधारे देखावे प्रस्तुत केले जातील.

या विशाल योजनेत तन, मन व धनाने आपली साथ असणे अनिवार्य आहे. सामग्री एकत्र करणे, तिला सुनियोजित रूपाने लावणे इत्यादीत आपणा सर्वांचा सहयोग अत्यंत आवश्यक आहे. तेव्हाच हे महान कार्य आपले खरे रूप प्राप्त करू शकेल.

चांगले होईल, जर जास्तीतजास्त साधकगण ज्यांच्याजवळ पूज्य गुरुजींशी संबंधित **चित्र, पत्र, लेख, घटनांचे संस्मरण** इत्यादींपैकी जे असेल, ते पाठवून या पावन योजनेला सफल बनवतील. आपला अमूल्य निधी निश्चित रूपाने या धर्मयात्रेचे महत्वपूर्ण अंग बनेल.

आमचे सौभाग्य आहे की इतिहासाच्या या महत्वपूर्ण वळणावर आम्ही आपल्या स्वतःला उभे पाहतो आहोत, आम्ही पुढे यावे व चिरकाळापासून चालत आलेल्या शुद्ध धर्माच्या गुरु-शिष्य परंपरेप्रती, विशेषतः पूज्य श्री सत्यनारायणजी गोयन्कांप्रती आपले हार्दिक आभार व्यक्त करत, या महान योजनेचे महत्वपूर्ण अंग बनून, आपली पुण्य पारमी विकसित करावी. त्यामुळे ज्या लोकांजवळ जी काही सामग्री उपलब्ध असेल त्यांनी ती स्पीड पोस्ट वा कूरियरद्वारे खालील पत्त्यावर लवकरात लवकर शेरळ पाठवावी. "ॲप" डिसेंबरपर्यंत कार्यक्षम होईल, त्यामुळे बाकीचे लोक तेव्हा पाठवू शकतील.

**पत्ताः- व्यवस्थापक,** विपश्यना विशोधन विन्यास, आर्काइव्स कार्यालय, गोराई खाड़ी, बोरीवली (पश्चिम), मुंबई-400091. ईमेल- dhammaarchives@globalpagoda.org

## विशाल आंकिक संरक्षणालय केंद्र

विपश्यना परिसरात एका मोठ्या अभिलेखागार किंवा आंकिक संरक्षणालय केंद्र (डिजिटल अकाईव्स सेंटर)च्या योजनेवर काम सुरु आहे. त्यामध्ये पूज्य गुरुजींनी जेव्हापासून काम सुरु केले तेव्हापासून आजपर्यंतचे सर्व प्रकारचे आलेख, टिप्पण्या (नोट्स), पुस्तकें, छायाचित्र (फोटो), कथानक (ऑडियो), चलचित्र (विडियो), विपश्यना विशोधन विन्यासद्वारा केलेले सर्व प्रकारचे शोधकार्य, विपश्यना पॅगोडा संबंधीचे फोटो, नकाशे, अन्य संबंधित दस्तावेज इत्यादीं कॉम्प्युटरच्या माध्यमातून अनेक शतके सुरक्षित राहतील.

हे कार्य अनेक वर्षांपर्यंत चालू राहील. कार्यारंभ करण्यासाठी आम्हाला अनेक कम्प्युटर, स्कॅनर, प्रिंटर इत्यादीसह सर्व प्रकारचे सामान ठेवण्यासाठी योग्य स्थान आणि जे ह्या पूर्ण परियोजनेचे संचालन करतील त्या कार्यकर्त्यांसाठी वेतन इत्यादीसाठी खर्च करावा लागेल. सर्व आवश्यकतांची पूर्ती करण्यासाठी जवळ-जवळ पंचविस लाखाचा खर्च येईल आणि वेतन इत्यादीसाठी जवळ-जवळ १५-२० लाख दरवर्षी लागतील.

'विपश्यना विशोधन विन्यास' रजिस्ट्रेशन सेक्शन ३५ (१) (३) च्या अंतर्गत झालेले आहे. यामुळे दान देणाऱ्यासाठी **१२५ प्रतीशत आयकराची सवलत** मिळेल. जे साधक-साधिका ह्या पुण्यात भागीदार होऊ इच्छितात ते खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क करु शकतात- 1. Mr. Derik Pegado, 9921227057. or 2.Sri Bipin Mehta, Mo. 9920052156, A/c. Office: 022-62427512/ 62427510; Email: audits@globalpagoda.org; Bank Details of VRI -- 'Vipassana Research Institute', Axis Bank Ltd., Sonimur Apartments, Timber Estate, Malad (W), Mumbai - 400064, Branch - Malad (W). Bank A/c No. - 911010004132846; IFSC No.- UTIB0000062; Swift code: AXISINBB062.

## पॅगोड्यावर रात्रभर प्रकाशाचे महत्व

पूज्य गुरुजी वेळोवेळी म्हणत असत की एखाद्या धातु-पॅगोड्यावर रात्रभर प्रकाश असण्याचे एक विशेष महत्व आहे. यामुळे वातावरण धर्म व मैत्री तरंगांनी भारलेले रहाते. संबंधिताच्या आठवणीनिमित्त पॅगोड्यावर प्रकाश दानासाठी प्रती रात्री रुपये ५०००/- ठरवले गेले आहेत. अधिक माहितीसाठी संपर्क करा- 1.Mr. Derik Pegado, 9921227057. or 2. Sri Bipin Mehta, Mo. 9920052156, Email: audits@globalpagoda.org

| | |
|---|---|
| **नवे उत्तरदायित्त्व** | **2. श्रीमती ज्योति मोलिया, राजकोट** |
| **वरिष्ठ सहायक आचार्य** | **3. श्रीमती गोली गीतांजली, हैदराबाद** |
| 1. श्रीमती उज्ज्वला अड्डिगा, सिकंदराबाद | **4. श्री सुकेतु ओझा, मुंबई** |
| **नव नियुक्ती** | **बाल-शिविर शिक्षक** |
| **सहायक आचार्य** | 1. Mr Preecha Seesaeng Thailand |
| **1. श्री बिहारी चौरे, वसई रोड** | 2. Mr Arthit Intarasit Thailand |

## प्राथमिक पाली अभ्यास कार्यक्रम

दि. ७ एप्रिल पासून २२ मे २०१८, योग्यता - दहा दिवसाची तीन शिबिरे. एक सतिपट्ठान शिबिर, आचार्याची अनुमती व १२ वी इयत्ता पास असणे आवश्यक आहे. ठिकाण - परियत्ति भवन. ग्लोबल पगोडा परिसर, गोराई. आवेदन पत्रासाठी खाली दिलेली शृंखला उपयोगात आणा. http://www.vridhamma.org/Theory-And-Practice-Courses किंवा फोन करा - ०२२ - ६२४२७५६० (सकाळी ९.३० ते संध्याकाळी ५-३० पर्यंत) E-mail: mumbai@vridhamma.org

## डोंग्यू गैट्सलिंग ननरीत विपश्यना शिबिर

कांगडा जिल्हा (हि. प्र.) येथील जेसुमा टेंजिंग पाल्मोद्वारा संचालित ननरीत ६३ लोकांचे एक शिबिर ऑगस्ट, २०१७ मध्ये आयोजित करण्यात आले. ज्यात ६०

तिबेटी भिक्षुणी होत्या. याचे संचालन एका वरिष्ठ विपश्यनाचार्यांनीं केले व ३ स. आचार्या तसेच १ धर्मसेविकेने सहयोग दिला. परिणाम खूप चांगले आले, ननरीद्वारे २०१८ मध्ये पुन्हा असे शिबिर आयोजित करण्याची मागणी करण्यात आली. सर्वांचे मंगल होवो!

## वि. पॅगोड्याजवळ 'धम्मालय' येथे निवास सुविधा

जे साधक पवित्र बुद्धधातू व बोधिवृक्षाच्या सान्निध्यात राहून गंभीर साधना करण्यास इच्छुक असतील त्यांच्यासाठी पॅगोड्याच्या बाजूला बनलेल्या 'धम्मालय अतिथी गृहात' निवासाची उत्तम सुविधा उपलब्ध आहे. रात्री पॅगोड्याची भव्यता व प्रभामंडळ दर्शनीय असते. धम्मालयात ३४ खोल्या दोन बेडच्या आहेत व २ जुळलेल्या खोल्या (अटॅच रूमही) आहेत. त्यासोबतच चहा, नास्ता, भोजना सुविधा आहे. अधिक माहिती व बुकिंगसाठी खालील पत्त्यावर संपर्क करावा–**श्री महेश मोदी,** फोन- 022-62427599, 8291894645 एवं ईमेल— info.dhammalaya@globalpagoda.org

येत्या १४ जानेवारीच्या एका दिवसीय महाशिबिरासाठी ५०% ची विशेष सुट देण्यात येत आहे. जे कोणी साधक दि. १३ ते १५ (तीन दिवस) या सुविधेचा लाभ घेऊ इच्छित असतील ते घेऊ शकतात. कदाचित अन्य महाशिबिरासाठीही ही सुविधा उपलब्ध होऊ शकेल.

## पॅगोडा परिसरात धर्मसेवक व साधकांसाठी निःशुल्क निवास सुविधा

प्रत्येक वर्षी **'विश्व विपश्यना पॅगोडा'** गोराई, बोरीवली, मुंबई येथे **एक दिवसीय महाशिबिरांचे** आयोजन करण्यात येते. त्यात सामील होण्यासाठी दूर-दूरुन लोक येतात. परंतु दुर्भाग्याने तिथे त्यांना रात्री राहाण्याची कोणतीही चांगली सुविधा नाही. त्यामुळे योजना आहे की पॅगोडा परिसरात एका स्वतंत्र ३-४ मजली इमारतीचे निर्माण केले जावे, ज्यात काही स्थायी धर्मसेवकांव्यतिरिक्त मोठ्या संख्येने येणाऱ्या साधकांसाठी काही एकेकाकरीता व काही अनेकांकरीता अशा निवासांची व्यवस्था केली जावी. ज्यामुळे रात्री निवासानंतर ते सकाळी आरामात उठून योग्य प्रकारे साधनेचा लाभ घेऊ शकतील. यासाठी जे साधक-साधिका या पुण्यकार्यात भागीदार होऊ इच्छित असतील, त्यांनी खालील पत्त्यावर संपर्क करावा:- 1. Mr. Derik Pegado, 9921227057. or 2. Sri Bipin Mehta, Mo. 9920052156, (details as in Archives Centre) Email: audits@globalpagoda.org

## ग्लोबल विपश्यना पॅगोड्यात एक दिवसीय महाशिबिरे व बृहत् संघदानाचे आयोजन

१४ जानेवारी २०१८ ला पूज्य माताजी आणि सयाजी ऊ बा खिन यांच्या पुण्यतिथीनिमित्त– **ग्लोबल विपश्यना पॅगोडा परिसरात** सकाळी १० वाजता **बृहत् संघदानाचे** आयोजन केले जात आहे. त्या नंतर ११ वाजेपासून साधक-साधिका एका दिवसाच्या **महाशिबिराचा** लाभ घेऊ शकतील. जे कोणी साधक-साधिका या पुण्यवर्धक दानकार्यात भाग घेऊ इच्छित असतील त्यांनी कृपया खालील पत्त्यावर संपर्क साधावा -1. Mr. Derik Pegado, 9921227057. or 2. Sri Bipin Mehta, Mo. 9920052156, फोन नं. 022-62427512 (9:30AM to 5:30PM), Email: audits@globalpagoda.org

**एक-दिवसीय महाशिबिरः** सकाळी **११ वाजेपासून संध्याकाळी ४ वाजेपर्यंत.** ३-४ वाजताच्या प्रवचनात साधना न केलेले लोकसुद्धा बसू शकतात. नाव नोंदणीसाठी कृपया निम्न फोन क्रमांक किंवा ईमेल द्वारा ताबडतोब संपर्क करा. कृपया नाव नोंदणी न करता येऊ नये. **समग्गानं तपोसुखो**- सामूहिक तप-सुखाचा लाभ घ्यावा. संपर्कः ०२२-२८४५११७०, ०२२-६२४२७५४४, मोबा. ८२९१८९४६४४ - Extn. 9, **(फोन बुकिंग: ११ t ५ v‚jpyt r0j)**
**Online Regn.**: www.oneday.globalpagoda.org

### दोहे धर्माचे

धन्य शेजार देशाचे, संत आणि अरहंत।
रक्षित ठेऊन सद्धर्म, मंगल केले अनंत॥
जन्म मिळे ज्या देशात, धर्म मिळे ज्या देश।
जागे हृदयी कृतज्ञता, श्रद्धा जागे अशेष॥
धर्म सदा जागृत असो, प्रज्ञा पडो ना मंद।
इंद्रिय सुखास भ्रांतिने, मान ना नित्यानंद॥
अंतर गंगा धर्माची, सतत होय प्रवाहित।
प्रतिपळ जागृत तटस्थ, दुख मुक्त हो त्वरित॥

### दोहे धर्माचे

धुतल्या पिळल्या वस्त्रासम, होय न कोणी संत।
आसक्ती द्वेष संपले, तर तो पूज्यसंत॥
अंधभक्तीने मानता, मिथ्यक होय दर्शन।
निज अनुभवाने जाणे, सम्यक होय दर्शन।
कोऱ्या बुद्धी वितर्काने, माने, सत्य न होय।
स्व आत अनुभवे तरच, सम्यक दर्शन होय॥
जोवर करतो कल्पना, तोवर मिथ्यक होय।
ज्या दिनी स्वतः अनुभवे, त्या दिन सम्यक होय॥

'विपश्यना विशोधन विन्यास' साठी प्रकाशक, मुद्रक व संपादकः राम प्रताप यादव, धम्मगिरी, इगतपुरी- ४२२ ४०३, दूरध्वनी : (०२५५३) २४४०८६, २४४०७६.
मुद्रण स्थान : अपोलो प्रिंटिंग प्रेस, जी-२५९, सीकॉफ लिमिटेड, ६९ एम. आय. डी. सी, सातपुर, नाशिक-४२२ ००७. **बुद्धवर्ष २५६१, कार्तिक पौर्णिमा, ४ नोव्हेंबर, २०१७**

**वार्षिक शुल्क रु. ३०/-, US $ 10, आजीवन शुल्क रु. ५००/-, US $ 100. File No: 1309361/Title-Code: MAHMAR48711/10-3-2017**

Posting day- **Purnima of Every Month,** Posted at **Igatpuri-422 403,** Dist. Nashik (M.S.)

**DATE OF PRINTING AND PUBLICATION: 4 November, 2017**

If not delivered please return to:-
**विपश्यना विशोधन विन्यास**
धम्मगिरी, इगतपुरी - ४२२ ४०३
जिल्हा-नाशिक, महाराष्ट्र, भारत
**फोन :** (०२५५३) २४४०७६, २४४०८६, २४३७१२, २४३२३८. **फैक्स :** (०२५५३) २४४१७६
Email: vri_admin@dhamma.net.in;
course booking: info@giri.dhamma.org
Website: www.vridhamma.org